




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३ • शनिवार दि.१९ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


# निकष बाजूला ठेवून सरकारने मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करावा

## सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची आढावा बैठकीत मागणी




नांदेड/प्रतिनिधी-पावसाअभावी खरीप हंगामातील लाखो हेक्टरमधील शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता जास्त असल्याने सरकारने निकष बाजुला ठेवून दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी आढावा बैठकीत केली आहे.

मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन मध्ये आढावा बैठक (शनिवार) सकाळी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्याच्या उर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, खा.प्रा.रविंद्र चव्हाण, खा.नागेश पाटील आष्टीकर, खा.संजय जाधव, आ.हेमंत पाटील, आ.सईदखान, आ.अमरनाथ राजूरकर, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.राजेश पवार, आ.भीमराव केराम, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ.राजू नवघरे, आ.कैलाश पाटील, आ.राहुल पाटील, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.इंद्र मणी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, उपायुक्त रिता मैत्रेवार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच खा.अशोक चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, खा.ओमराजे निंबाळकर, खा.बजरंग सोनवणे, खा.कल्याण काळे यांच्यासह विविध मतदारसंघातील आमदार दुरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

राज्यात अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पाऊस अत्यंत कमी झाला आहे. मराठवाड्यातील ७६ तालुक्यांमध्ये हजारो हेक्टरमधील कापुस, सोयाबीन, तुर, मुग व इतर पिकांसह फळबागांचेही नुकसान झाले. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पशुंच्या चाराचा प्रश्न व पाण्याचा प्रश्न निर्माण होवू लागला आहे. जालना जिल्ह्यात तर जनावरांना एक महिना पुरेल एवढाच चारा उपलब्ध आहे. पिके करपल्याने शेती उत्पादनावर मोठा परिणाम झाला असून शेतकऱ्यांच्या पाठीमागे सरकारने खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे असे मत बैठकीत उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींनी व्यक्त केले. नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. जनावरांसाठी चारा छावण्या व ग्रामीण भागात पाण्याच्या टंचाई बाबत नियोजन **पान ४ वर**

### दुष्काळात काजू-बदाम;मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला संवेदनशीलतेचे निर्देश

नागपूर-या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना, बैठकीत ड्रायफ्रूट ठेवण्याची प्रशासनाची पद्धत असली तरी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत, असे सांगितले. प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संवेदनशीलपणे वागले पाहिजे, असे निर्देशही त्यांनी दिले. राज्यातील दुष्काळी भागांचा आढावा घेऊन पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून शेतकऱ्यांना तातडीने मदत केली जाईल. पिण्याचे पाणी, चारा आणि शेतीसाठी अतिरिक्त वीज उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मराठवाड्यातील लहान धरणांतील पाणीसाठा लक्षात घेता पिण्याच्या पाण्यासाठी पाणी राखून ठेवण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# सहकारमंत्री बाबासाहेब पाटलांवर अपात्रतेची टांगती तलवार

## लातूर जिल्हा बँकेत खळबळ;आरबीआयच्या निर्णयाला आव्हान देणार

लातूर:लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदावर सलग दहा वर्षांपेक्षा अधिक काळ राहिल्याच्या प्रकरणात सहकारमंत्री बाबासाहेब मनोहरराव पाटील यांच्यावर रिझर्व्ह बँकेने कारवाई केल्याचे वृत्त समोर आले आहे. दहा वर्षांच्या संचालकपदाच्या मर्यादेचा नियम लागू होत असल्याचे नमूद करत आरबीआयने पाटील यांना संचालकपदावरून हटविल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद व अधिकृत मतदार प्रतिनिधी सतीश शेषराव जाधव यांनी २५ मे २०२६ रोजी आरबीआयकडे तक्रार दाखल केली होती. बँकेच्या १९ सदस्यीय संचालक मंडळातील आठ संचालकांनी दहा वर्षांपेक्षा अधिक काळ पद भूषविल्याचा आक्षेप तक्रारीत घेण्यात आला होता. यामध्ये बाबासाहेब पाटील यांच्यासह अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर, श्रीपतराव निवृत्ती काकडे, स्वयंप्रभा धनंजय पाटील, व्यंकटराव धोंडीराम बिरादार, पृथ्वीराज हरिश्चंद्र सिरसाट, प्रमोद जाधव आणि नागोराव आर. पाटील यांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले होते.या प्रकरणी सतीश जाधव यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. ३ ऑगस्ट रोजी न्यायालयाने आरबीआयला २५ मे रोजी दाखल झालेल्या तक्रारीवर गुण-दोषांच्या आधारे सहा आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर या प्रकरणातील हालचालींना वेग आला.

# दुष्काळाच्या आढावा बैठकीत नेत्यांना काजू-बदामांची मेजवानी

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाड्यातील दुष्काळ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आज (शनिवार) सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन मध्ये आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नेत्यांसाठी काजू आणि बदामाची व्यवस्था करण्यात आल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाने होरपळून निघत आहे. तुर, मुग, कापुस, सोयाबीन या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पावसाने पाठ फिरविल्याने शेतातील उभी पिकेही करपून गेली आहेत. जनावरांचा चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून मराठवाड्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. दुष्काळ परिस्थीतीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी नियोजन भवन मध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह नांदेड, परभणी, हिंगोली,



लातूर जिल्ह्यातील खासदार, आमदार उपस्थित होते. काही लोकप्रतिनिधींनी दुरदृश्य प्रणालीद्वारे हजेरी लावली. बैठकीत दुष्काळाचे भीषण वास्तव आणि शेतकरी संकटावर गांभीर्याने चर्चा करण्याऐवजी बैठकीत उपस्थित असलेले नेते आणि प्रशासकीय अधिकारी काजू-बादामचा आस्वाद घेत होते. प्रशासनाकडून काजू-बादामाची व्यवस्था करण्यात आली होती. सदरील प्रकारामुळे तीव्र **पान ४ वर**

# कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा ताफा अडवून काँग्रेसची घोषणाबाजी

## सुकलेले सोयाबीन दाखवत दुष्काळ जाहीर करण्याची केली मागणी

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वाहनाचा ताफा शासकीय विश्रामगृहात काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी अडवून घोषणाबाजी केली. पावसाअभावी सुकलेले सोयाबीन दाखवत नांदेड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती संदर्भात आढावा घेण्यासाठी विभागीय बैठक आज (शनिवार) सकाळी नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे शुक्रवारी रात्री उशिरा नांदेडमध्ये दाखल झाले होते. सकाळी बैठकीला रवाना होण्यापूर्वी शासकीय विश्रामगृहात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वाहनांचा ताफा अडविला. नांदेड **पान ४ वर**



(छाया : करणसिंह बैस)

# टीईटीच्या पेपरची १ लाखांत विक्री

## १८ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र;१६ जण अटकेत,२ फरार

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात ठाणे पोलिसांनी १८ आरोपींविरुद्ध सुमारे ३५०० पानी दोषारोपपत्र भिवंडी न्यायालयात दाखल केले आहे. यापैकी १६ आरोपींना अटक करण्यात आली असून दोन आरोपी अद्याप फरार आहेत. तपासात इलेक्ट्रॉनिक पुरावे, आर्थिक व्यवहार, साक्षीदारांचे जबाब तसेच मूळ प्रश्नपत्रिकेची जप्ती यासह महत्त्वाचे पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले आहेत.

शिक्षक भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या टीईटीची प्रश्नपत्रिका तब्बल ८० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत विकली जात असल्याचे तपासात समोर आले आहे. विशेष म्हणजे, प्रश्नपत्रिका मिळण्यापूर्वीच काही उमेदवारांची मूळ शैक्षणिक कागदपत्रे आरोपींकडून ताब्यात घेतली जात होती. पैसे दिल्यानंतरच ही कागदपत्रे परत केली जात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.पेपरफुटीचे धागेदोरे उत्तर प्रदेशातील आग्रा येथील महिम पत्रन प्रिंटिंग प्रेसपर्यंत पोहोचले आहेत.

# नायगाव-मुखेड जिल्हा झाला तर नांदेडला राज्य करायचे का?




दृष्टीक्षेप
प्रदीप नागापूरकर

मराठवाडा मुक्ती दिनाच्या दिवशी नायगावला जिल्हा करा, अशी मागणी पुढे आली. विशेष म्हणजे या मागणीसाठी आयोजित केलेल्या परिषदेला नांदेडचे खा.प्रा. रवींद्र चव्हाण उपस्थित होते. नायगाव हे खासदारांचे होमटाऊन असल्याने या उपस्थितीची राजकीय चर्चा होणे साहजिकच आहे. आता त्यात भर पडली ती मुखेडला जिल्हा करण्याच्या मागणीची! म्हणजे नांदेड जिल्ह्याचे तुकडे करण्याची स्पर्धाच सुरू झाली की काय?, असा प्रश्न पडतोय. उद्या कंधार म्हणेल, 'आम्हालाही जिल्हा करा!' लोहा म्हणेल, 'आम्ही काय कमी आहोत?' मग धर्माबाद, बिलोली, देगलूर, हदगाव यांनीही आपापल्या जिल्ह्याच्या मागण्या घेऊन रांगेत उभे राहायचे का? असं सगळ्यांना जिल्हे वाटत सुटलं तर शेवटी 'नांदेड' नावाचा जिल्हा उरेल तरी किती?

आणि गंमत अशी की; नायगाव जिल्हा झाला, मुखेड जिल्हा झाला, बाकीचेही उद्या जिल्हे झाले तर नांदेडकरांनी काय करायचं? नांदेडला राज्याचा दर्जा द्या, अशी मागणी करायची का? मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ आणि मंत्रालयही मग नांदेडलाच आणायचे का? जिल्हा निर्मितीला कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही. जिथे खरोखर प्रशासकीय गरज आहे, भौगोलिक अंतर मोठे आहे, जनतेला शासकीय कामांसाठी मोठा त्रास सहन करावा लागतो, अशा भागाला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा मिळणे ही रास्त मागणी आहे.

**पण मग किनवटचे काय?**

नांदेडपासून तब्बल दीडशे किलोमीटर अंतरावर असलेला किनवट. डोंगराळ, आदिवासी बहुल आणि पूर्वी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला गेलेला हा भाग. जंगल, दुर्गम गावे आणि मूलभूत सुविधांसाठी आजही संघर्ष करणारी जनता. जिल्ह्याचे प्रशासकीय कार्यालय गाठण्यासाठी एवढा लांबचा प्रवास करावा लागतो. किनवटला जिल्हा करण्याची मागणी अनेक वर्षांपासून सर्वपक्षीय पातळीवर होत आहे.म्हणजे ज्याला भौगोलिक आणि प्रशासकीय कारणांचा भक्कम आधार आहे, त्या किनवटची मागणी वर्षानुवर्षे प्रलंबित आणि आता अचानक नायगाव-मुखेडच्या जिल्हा निर्मितीच्या मागण्या पुढे येतात! मग प्रश्न साधा आहे, जिल्हे जनतेच्या सोयीसाठी करायचे आहेत की राजकीय सोयीसाठी? नायगावला जिल्हा करण्याची मागणी करणाऱ्यांना विरोध करण्याचा प्रश्न नाही. मुखेडकरांनाही जिल्हा हवा असेल तर त्यांनी मागणी करावी. लोकशाहीत मागणी करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. पण सरकारने जिल्हा निर्मितीसाठी समान निकष ठरवावेत. अंतर, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, प्रशासकीय गरज, आर्थिक व्यवहार्यता आणि विकासाची आवश्यकता या सगळ्यांचा विचार व्हायला हवा. नाहीतर उद्या प्रत्येक तालुक्याला जिल्हा आणि प्रत्येक मोठ्या गावाला तहसील करण्याची वेळ येईल!आणखी गंमत म्हणजे मराठवाडा मुक्ती दिनाच्या दिवशीच नायगाव जिल्ह्याची मागणी पुढे येते आणि त्या कार्यक्रमाला खासदारांची उपस्थिती असते. त्यामुळे जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. खासदारांनी या मागणीला पाठिंबा दिला असेल तर त्यांनी त्यामागची कारणेही स्पष्ट करावीत. कारण ते फक्त नायगावचे खासदार नाहीत; ते संपूर्ण नांदेड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी आहेत. नांदेड जिल्ह्याचा विकास व्हावा, प्रत्येक तालुक्याला न्याय मिळावा, दुर्गम भागातील जनतेला प्रशासन जवळ मिळावे, यासाठी आवाज उठवणे ही काळाची गरज आहे.पण जिल्ह्याचे तुकडे करून विकास होतो की विकासासाठी प्रशासनाचे विकेंद्रीकरण केले जाते, याचा फरक समजून घ्यायला हवा.नाहीतर उद्या नांदेडकर मिश्कीलपणे एवढेच म्हणतील 'नायगाव जिल्हा, मुखेड जिल्हा, किनवट जिल्हा... बाकीचेही जिल्हे करा रं भाऊ!' आणि शेवटी नांदेडला राज्याचा दर्जा द्या. निदान राजधानी तरी आपल्याकडे राहील! विनोदाचा भाग सोडला तर प्रश्न गंभीर आहे. जिल्हा निर्मिती ही जनतेच्या प्रशासनिक गरजेवर ठरावी, राजकीय सोयीनुसार नव्हे. नाहीतर 'जिल्हा कोणाचा?' या प्रश्नापेक्षा 'नांदेड उरलाय तरी कुठे?' हा प्रश्न मोठा होईल!


# दुष्काळाची चाहूल की,संकटाची घंटा?

**पावसाळा संपण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असताना मराठवाड्याच्या आभाळाकडे पुन्हा एकदा चिंतेने पाहण्याची वेळ आली आहे. जून-जुलैमध्ये पावसाने आशा निर्माण केली; मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला पडलेल्या प्रदीर्घ खंडाने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले. आता काही भागांत पाऊस परतला असला तरी तो झालेला नुकसानीचा हिशेब पुसण्यासाठी पुरेसा आहे का?, हा खरा प्रश्न आहे. मराठवाड्यात सप्टेंबरमधील पावसाची मोठी तूट राहिली असून खरीप पिकांवर त्याचा परिणाम झाला आहे.दुष्काळ म्हणजे केवळ पावसाची आकडेवारी नव्हे. शेतातील उभे पीक करपणे, विहिरींची पाणीपातळी खालावणे, धरणांमधील साठा कमी होणे, जनावरांसाठी चाऱ्याची चिंता निर्माण होणे आणि पुढील रब्बी हंगामाचे नियोजन अडचणीत येणे, या सगळ्यांची बेरीज म्हणजे दुष्काळाची चाहूल. आज मराठवाड्यातील परिस्थिती याच दिशेने जात असल्याचे चित्र आहे. काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या खंडाचा दुष्काळाचा पहिला निकष लागू झाल्याचे अहवाल आहेत.नांदेड जिल्हाही या संकटापासून दूर नाही. जिल्ह्यातील काही भागांत सोयाबीनसह खरीप पिकांची वाढ खुंटली आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला ग्रामीण नांदेडमधील पिकांची पाहणी प्रशासनाने केली. काही भागांत झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना थोडासा दिलासा दिला असला तरी आधी झालेली हानी किती भरून निघेल, हे आगामी काळातील पावसावर अवलंबून आहे. संकटाची दुसरी बाजू पाण्याची आहे. मराठवाड्यातील काही जलसाठ्यांची परिस्थिती चिंताजनक झाल्याने पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचे आदेश प्रशासनाला द्यावे लागले होते. याचा अर्थ पुढील काळातील रब्बी हंगाम, जनावरांचा चारा आणि ग्रामीण भागातील पाणीपुरवठा यांचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे.दरवर्षी पावसाचा लहरीपणा वाढतो आहे. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा दीर्घ खंड, तर कधी पेरणीच्या वेळी पाऊस आणि पीक वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर दुष्काळी परिस्थिती; या चक्रात शेतकरी अडकला आहे. शेतकऱ्याने पेरणीसाठी कर्ज काढायचे, महागडी बियाणे-खते घ्यायची, मेहनत करायची आणि शेवटी निसर्गाने साथ दिली नाही तर सर्व गुंतवणूक मातीमोल होते. काही भागांत सोयाबीनचे पीक वाचण्याची शक्यता कमी झाल्याने शेतकऱ्यांनी उभ्या पिकावर ट्रॅक्टर फिरविल्याचेही वृत्त आहे.अशा परिस्थितीत सरकारने केवळ पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू करून थांबणे पुरेसे नाही. नुकसान किती झाले याचा वस्तुनिष्ठ आणि वेगवान सर्वेक्षण अहवाल तयार झाला पाहिजे. पंचनाम्यांमध्ये प्रत्यक्ष शेतकऱ्याचे नुकसान प्रतिबिंबित झाले पाहिजे. मदतीसाठी पुन्हा कागदपत्रांच्या आणि कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊ नये. शासनाने दिलासा जाहीर करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो दिलासा शेतकऱ्याच्या खात्यावर वेळेत पोहोचणे महत्त्वाचे आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीची मदत मिळण्याची वाट न पाहता राज्य सरकारकडून तातडीने मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच पिकांची पाहणी आणि पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबत प्रशासनाला निर्देश दिल्याचे सांगितले. आता या आश्वासनाची अंमलबजावणी किती वेगाने होते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.मराठवाडा मुक्ती दिनाच्या निमित्ताने मराठवाड्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याची घोषणा करणे स्वागतार्ह आहे; पण आजच्या संकटाकडे उद्याच्या योजनेच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. आज करपलेले पीक, आजची पाण्याची चिंता आणि आज शेतकऱ्याच्या डोक्यावर असलेले कर्ज यावर तातडीचा उपाय हवा. दीर्घकालीन जलव्यवस्थापन, सिंचन प्रकल्प आणि पाणी वळविण्याच्या योजना आवश्यक आहेतच; पण त्यांची फळे मिळेपर्यंत शेतकरी टिकला पाहिजे.दुष्काळाच्या संकटात शेतकरी एकटा नसतो. त्याच्याबरोबर शेतमजूर, ग्रामीण दुकानदार, वाहतूकदार, छोटे व्यावसायिक आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत येते. त्यामुळे दुष्काळाला केवळ कृषी विभागाचा प्रश्न न मानता तो ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.पावसाने आज थोडीशी आशा दाखवली म्हणून संकट संपले असे समजणे धोकादायक ठरेल. त्याचप्रमाणे दुष्काळाची घोषणा झाली नाही म्हणून परिस्थिती गंभीर नाही, असेही म्हणता येणार नाही. सरकारने आकडेवारीच्या पलीकडे जाऊन शेतातील वास्तव पाहिले पाहिजे. दुष्काळाची घंटा वाजत आहे. ती ऐकूनही जर प्रशासन कागदी प्रक्रियेत अडकून राहिले, तर संकट अधिक गडद होईल. आज गरज आहे ती घोषणा नव्हे, तर तातडीच्या कृतीची. शेतकऱ्याला मदतीचा हात वेळेत मिळाला, तर संकटाची तीव्रता कमी करता येईल; अन्यथा पावसाचा खंड केवळ पिकेच नाही, तर ग्रामीण जीवनाचेही गणित बिघडवून जाईल.**

# स्वामी रामानंद तीर्थ:विचार आणि वर्तमान

**प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार**

१७ सप्टेंबर १९४८ हा मराठवाड्याच्या इतिहासातील प्रदीर्घ संघर्षाचा निर्णायक दिवस. भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला; मात्र हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकचा काही भाग निजामाच्या राजवटीखालीच होता. राजकीय स्वातंत्र्यावर निर्बंध होते, निजामशाहीची निरंकुश सत्ता होती आणि रझाकारांच्या दहशतीने सामान्य जनजीवन भयभीत झाले होते. स्वातंत्र्याची पहाट देशाच्या अनेक भागांत उगवली होती; मराठवाड्याला मात्र त्या पहाटेची प्रतीक्षा होती. या संघर्षाला संघटित जनआंदोलनाचे स्वरूप देणाऱ्या नेतृत्वात स्वामी रामानंद तीर्थ यांचे स्थान अग्रक्रमाचे आहे. व्यंकटेश भवानराव खेडगीकर हे त्यांचे मूळ नाव. तरुण वयात संन्यास स्वीकारल्यानंतर त्यांनी रामानंद तीर्थ हे नाव धारण केले. त्यांच्या संन्यासाची दिशा समाजापासून दूर जाण्याची नव्हती; समाजाच्या मध्यभागी उतरून कर्म करण्याची होती. हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळा आणि औसा येथील शैक्षणिक कार्यातून त्यांनी तरुणांच्या मनात राष्ट्रभावना, स्वावलंबन आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यास सुरुवात केली.



शिक्षण, विचार आणि राष्ट्रकार्य यांची सांगड त्यांच्या जीवनाच्या प्रारंभापासूनच दिसते. पुढे हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेत आणि नेतृत्वात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सत्याग्रह, असहकार आणि जनजागृतीच्या माध्यमातून मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकातील जनतेला व्यापक संघर्षाशी जोडले.निजामशाही विरुद्धच्या आंदोलनामुळे त्यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगाच्या भिंतींनी त्यांच्या शरीराला अडवले; त्यांच्या विचारांचा आणि नेतृत्वाचा प्रवाह मात्र थांबवता आला नाही. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने ऑपरेशन पोलो सुरू केले आणि १७ सप्टेंबरला निजामाने शरणागती पत्करली. हैदराबाद संस्थान भारतीय संघात विलीन झाले. या मुक्तीच्या इतिहासात स्वामीजींच्या नेतृत्वासोबत दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, अनंत भालेराव, रविनारायण रेड्डी आणि असंख्य ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे योगदान आहे. महिलांनीही या संघर्षात धैर्याची नवी उदाहरणे घडवली. दगडाबाई शेळके, गोदावरीबाई टेके, सोनाबाई पाटील, त्रिवेणीबाई पाटील, रुक्मिणीबाई कोरडे आणि आशाताई वाघमारे यांसारख्या महिलांनी सत्याग्रह, निदर्शने, तुरुंगवास तसेच भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय, अन्न आणि गुप्त संदेश पोहोचविण्याचे काम केले. त्यामुळे १७ सप्टेंबरची स्मृती एका व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही; ती हजारो स्त्री-पुरुषांच्या धैर्य, त्याग आणि संघर्षाची सामूहिक स्मृती बनते.

मुक्तीनंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे क्षेत्र व्यापक झाले. निजामशाहीविरुद्धचा राजकीय संघर्ष संपल्यानंतर समाजनिर्मितीचा नवा अध्याय सुरू झाला आणि शिक्षण हा त्याचा केंद्रबिंदू ठरला. निजामशाहीच्या काळात मराठवाड्यातील ग्रामीण, गरीब, बहुजन आणि वंचित समाज मोठ्या प्रमाणावर शिक्षणापासून दूर राहिला होता. या समाजाला ज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी स्वामीजींनी संस्थात्मक प्रयत्न सुरू केले. २६ जून १९५० रोजी नांदेड येथे पीपल्स कॉलेजची स्थापना हा त्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून समाजाच्या सहभागातून उभी राहिलेली ही संस्था मराठवाड्याच्या शैक्षणिक इतिहासातील महत्त्वाची घटना ठरली. कर्माचे डोळे ज्ञान ते निर्दोष होआवे हे ब्रीदवाक्य त्यांच्या शिक्षणदृष्टीचा गाभा स्पष्ट करते. ज्ञानाला कर्माची जोड, कर्माला नैतिकतेची दिशा आणि शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जाणीव, अशी त्यांच्या शिक्षणाची रचना होती. हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेत सूतकताई, शेती आणि श्रमदान यांना शिक्षणाचा भाग बनवून त्यांनी विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठेचा संस्कार दिला. अंबाजोगाईतील योगेश्वरी नूतन विद्यालयासह विविध शैक्षणिक उपक्रमांतून राष्ट्रप्रेम, चारित्र्य, स्वावलंबन आणि सामाजिक जाणीव असलेली पिढी घडवण्याचा प्रयत्न झाला. शिक्षणातून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिकत्वाची जाणीव मिळावी, संस्थाचालकांनी समाजाच्या विश्वासाचे विश्वस्त म्हणून काम करावे आणि गुणवत्तेला, पारदर्शकतेला व सामाजिक बांधिलकीला प्राधान्य मिळावे, अशी त्यांची अपेक्षा होती. आज मराठवाड्यात शिक्षणसंस्थांचे मोठे जाळे उभे आहे. नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. आधुनिक अभ्यासक्रम, तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांसमोर संधींचे मोठे विश्व खुले झाले आहे. त्याच वेळी शिक्षणाभोवती बाजारव्यवस्थेचे वर्तुळही घट्ट झाले आहे. प्रवेश, शुल्क, पॅकेज, प्लेसमेंट, ब्रँड आणि रँकिंग यांच्या भाषेत शिक्षणाचे मूल्यमापन होऊ लागले आहे. ज्ञानाची किंमत गुणपत्रिकेत आणि विद्यार्थ्याची किंमत पगाराच्या आकड्यात मोजली जाऊ लागली, की स्वामीजींच्या शिक्षणविचारातील चारित्र्य, विवेक आणि सामाजिक बांधिलकी यांची आठवण अधिक तीव्र होते. इमारतींची उंची शिक्षणसंस्थेचा विस्तार सांगते; विद्यार्थ्यांच्या विचारांची उंची तिची खरी गुणवत्ता सांगते.

शिक्षणसंस्थेची खरी गुणवत्ता शिक्षकांच्या आचरणातून प्रकट होते. स्वामी रामानंद तीर्थांच्या शैक्षणिक दृष्टिकोनात शिक्षकाला स्वतंत्र विचार, सामाजिक भान आणि नैतिक धैर्य असलेली भूमिका अपेक्षित होती. आज त्यांच्या नावाने चालणाऱ्या संस्थांमध्ये संस्थाचालकांसमोर मान तुकवणे, चुकीच्या निर्णयावर मौन धारण करणे किंवा वैयक्तिक हितासाठी व्यवस्थापनाची हुजरेगिरी करणे ही प्रवृत्ती स्वामीजींच्या विचारांशी विसंगत ठरते. शिक्षकाची निष्ठा व्यक्तीशी नसते; ती शिक्षणाच्या मूल्यांशी, विद्यार्थ्यांशी आणि संस्थेच्या व्यापक उद्दिष्टांशी असते. एखाद्या महाविद्यालयाला एससी-एसटीचा शिक्का लागल्याची भाषा केली जाते, तेव्हा त्या शब्दांपेक्षा त्यामागची मानसिकता अधिक गंभीर ठरते. विद्यार्थ्याची जात त्याच्या गुणवत्तेचे मोजमाप ठरू शकत नाही. वंचित विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे आणण्याची क्षमता ही संस्थेच्या सामाजिक उत्तरदायित्वाची कसोटी ठरते.हा शिक्का विद्यार्थ्यांवर नसून अशी भाषा करणाऱ्या मानसिकतेवर आहे. जातीय पूर्वग्रह आणि व्यवस्थापनाची हुजरेगिरी या दोन्ही गोष्टी शिक्षकाच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला कमकुवत करतात. स्वामीजींच्या जयंती-पुण्यतिथीला पुष्पहार अर्पण करणे, शुभेच्छा संदेश पाठवणे, त्यांच्या विचारांवर लेख लिहिणे आणि पुस्तके प्रकाशित करणे सहज शक्य आहे; त्या विचारांशी प्रामाणिक राहून संस्थेच्या व्यवहारात निर्भय भूमिका घेणे अधिक महत्त्वाचे आहे. अन्याय दिसला की प्रश्न विचारणे, विद्यार्थ्यांच्या हितासाठी उभे राहणे आणि चुकीच्या निर्णयासमोर विवेकाची भूमिका मांडणे, हीच शिक्षकाच्या वैचारिक स्वातंत्र्याची खरी परीक्षा आहे. स्वामीजींच्या नावाचा उच्चार करणाऱ्या शिक्षकांनी आपल्या आचरणात स्वामीजींचा किती अंश उतरला आहे, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

शिक्षणातून समाजनिर्मितीची वाट उघडताना स्वामीजींनी सामाजिक समतेचा प्रश्नही आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी ठेवला. अस्पृश्यता निवारण, दलितोद्धार, ग्रामविकास, खादी, ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग यासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजातील शेवटच्या घटकाला सन्मानाने जगता यावे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळावे आणि श्रमाला प्रतिष्ठा मिळावी, या विचारातून त्यांचे समाजकार्य पुढे गेले. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत सहभागी होऊन त्यांनी भूमिहीनांसाठी जमीन मिळविण्याचे आवाहन केले. अध्यात्म त्यांच्या जीवनात कर्मयोगाची प्रेरणा बनले. समाजातील विषमता आणि अन्याय यांच्याकडे पाठ फिरवून अध्यात्म साधता येत नाही, ही जाणीव त्यांच्या कार्यातून दिसते. आज सामाजिक न्यायाची भाषा सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर रूढ झाली आहे. कायदे आहेत, योजना आहेत, प्रतिनिधित्वाची चर्चा आहे; तरीही जातीची दरी, आर्थिक विषमता, ग्रामीण-शहरी अंतर आणि संधींची असमानता समाजाच्या रचनेत दिसते. स्वामीजींच्या काळात भूमिहीनाला जमीन मिळवून देण्याचा प्रश्न होता; आज दर्जेदार शिक्षण, तंत्रज्ञान, रोजगार आणि संधींपासून दूर राहणारा माणूस नव्या प्रकारच्या वंचितपणाला सामोरा जातो. काळ बदलला, साधने बदलली; वंचितपणाची काही रूपे मात्र आपली जागा बदलून टिकून राहिली. म्हणून स्वामीजींच्या सामाजिक कार्याकडे पाहताना भूदानाची आठवण पुरेशी ठरत नाही; आजच्या समाजातील संधींचे वाटपही त्याच नजरेने तपासावे लागते.

स्वामीजींच्या सार्वजनिक जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची राजकीय कारकीर्द. स्वातंत्र्यानंतर त्यांनी संसदीय राजकारणात प्रवेश केला. १९५२ मध्ये गुलबर्गा आणि १९५७ मध्ये औरंगाबाद मतदारसंघातून लोकसभेवर निवडून येऊन त्यांनी शेतकरी, कामगार आणि उपेक्षित घटकांचे प्रश्न संसदेत मांडले. नियोजनबद्ध विकास, शिक्षण आणि ग्रामीण समाजाच्या प्रश्नांवर त्यांनी भूमिका घेतली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या काळात मराठवाडा महाराष्ट्राचा भाग व्हावा, या भूमिकेलाही त्यांनी पाठिंबा दिला. दोन वेळा खासदार राहिल्यानंतर त्यांनी सक्रिय राजकारणापासून स्वतःला दूर केले. पदाचा उपयोग समाजासाठी करणे आणि योग्य वेळी पदापासून अलिप्त होणे, या दोन्ही गोष्टी त्यांच्या सार्वजनिक जीवनातून दिसतात. आज राजकारणात सत्ता, निवडणुकीचे गणित, पक्षीय समीकरणे, युती आणि प्रतिमानिर्मिती यांचे महत्त्व मोठे झाले आहे. विचारांची राजकीय किंमत आणि सत्तेची राजकीय किंमत यांच्यातील अंतर वाढताना दिसते. स्वामीजींच्या काळात तुरुंगवास हा सार्वजनिक संघर्षाचा भाग होता; आज सार्वजनिक जीवनात पद गमावण्याची भीती अनेकदा संघर्षाची मर्यादा ठरवते. त्यांनी राजकारणाचा उपयोग समाजासाठी केला; आज समाजसेवेच्या भाषेतून राजकीय उपयोग साधण्याची प्रवृत्तीही दिसते. त्यांच्या जीवनाकडे पाहिले की सार्वजनिक पदाची प्रतिष्ठा त्याच्या कालावधीने नव्हे, तर त्या पदातून समाजाला मिळालेल्या योगदानाने ठरते, ही साधी गोष्ट पुन्हा लक्षात येते.

स्वामी रामानंद तीर्थ यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखन आणि चिंतनामुळे अधिक व्यापक होते. हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्याचे स्मरणचित्रण, अध्यात्म, कर्मयोग, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मिती यांविषयी त्यांनी मांडलेले विचार त्यांच्या वैचारिक खोलीची ओळख करून देतात. उपनिषदे, भगवद्गीता आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. शिक्षण हे उपजीविकेचे साधन असतानाच माणसाला नीतिमान, विवेकी आणि समाजाभिमुख बनवणारे माध्यम असावे, अशी त्यांची भूमिका होती. पी. व्ही. नरसिंह राव यांसारख्या पुढील पिढीतील नेतृत्वावर त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. गोविंदभाई श्रॉफ आणि अनंत भालेराव यांसारख्या सहकाऱ्यांनी त्यांच्या कार्याची आणि विचारांची परंपरा पुढे नेली. आज माहितीच्या विस्फोटाच्या काळात स्वामीजींच्या या विचारांकडे पाहण्याची गरज अधिक आहे. माहिती मिळविणे क्षणाचे काम झाले आहे; तिची सत्यता तपासणे, तिचा अर्थ समजून घेणे आणि तिच्यावर विवेकाने भूमिका घेणे ही मोठी कसोटी बनली आहे. शिक्षणसंस्थांनी माहिती देण्यापलीकडे जाऊन विचार करण्याची क्षमता निर्माण केली, तरच ज्ञानाचे रूपांतर समाजशक्तीत होईल. अन्यथा हातात साधने आधुनिक आणि विचारांची पद्धत जुनाट, अशी विसंगती निर्माण होण्याचा धोका आहे.

१७ सप्टेंबर आला की स्वामीजींच्या स्मृती जाग्या होतात. मुक्तिसंग्रामातील त्यागाची आठवण केली जाते, कार्यक्रम होतात, भाषणे होतात आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. स्मरणाची ही परंपरा आवश्यक आहे; मात्र स्मृतीचा खरा अर्थ वर्तमानाच्या आचरणात दिसतो. स्वामीजींच्या नावाने चालणाऱ्या संस्थेत गुणवत्ता किती आहे, कारभारात पारदर्शकता किती आहे, विद्यार्थ्यांमध्ये विवेक आणि सामाजिक जाणीव किती रुजते, शिक्षकांच्या आचरणात मूल्ये किती दिसतात आणि सार्वजनिक जीवनात समाजहिताला किती स्थान मिळते, यावर त्यांच्या विचारांचे वर्तमानातील अस्तित्व ठरते. वर्षातून एका दिवशी स्वामीजींच्या प्रतिमेला हार घालणे सोपे आहे; त्यांच्या मूल्यांना संस्थेच्या कारभारात, वर्गखोलीत आणि सार्वजनिक जीवनात स्थान देणे ही खरी कसोटी आहे. स्मृतिदिनाचा कार्यक्रम संपल्यानंतर व्यासपीठ रिकामे होते; त्यानंतर उरते ती आपल्या कृतीची जबाबदारी. स्वामीजींच्या नावाने उभ्या राहिलेल्या संस्था त्यांच्या स्मृतीची खूण आहेत; त्या संस्थांतून निर्माण होणारा विवेकी, चारित्र्यसंपन्न आणि समाजाभिमुख विद्यार्थी त्यांच्या विचारांचा खरा वारसदार ठरतो.

स्वामी रामानंद तीर्थांनी निजामशाहीविरुद्धच्या संघर्षाला जनतेची शक्ती दिली आणि मुक्तीनंतर त्याच जनशक्तीला शिक्षण, सामाजिक समता, ग्रामविकास आणि राष्ट्रनिर्मितीची दिशा दिली. त्यांच्या जीवनात मुक्तिसंग्रामातील धैर्य, शिक्षणातील विवेक, समाजकारणातील समता, श्रमातील प्रतिष्ठा, राजकारणातील त्याग आणि अध्यात्मातील कर्मयोग एकत्र येतात. २२ जानेवारी १९७२ रोजी त्यांचे निधन झाले; त्यांच्या कार्याचा प्रवाह मात्र संस्था, विद्यार्थी, कार्यकर्ते आणि विचारांच्या रूपाने पुढे चालू राहिला. आज त्यांच्याच नावाने विद्यापीठ आहे, शिक्षणसंस्था आहेत, स्मारके आहेत आणि दरवर्षी त्यांचे स्मरण करणारा १७ सप्टेंबर आहे. आता त्यांच्या कार्याची खरी कसोटी या स्मृतींच्या पलीकडे आहे. शिक्षण बाजाराच्या भाषेत बोलत असताना त्यात माणूसपणाचा आवाज किती ऐकू येतो, संस्था विस्तारत असताना त्यांची सामाजिक जबाबदारी किती वाढते, राजकारण सत्तेच्या समीकरणांत अडकत असताना त्यात जनतेच्या प्रश्नांना किती जागा उरते आणि सामाजिक न्यायाची भाषा वाढत असताना प्रत्यक्ष संधींचे वाटप किती न्याय्य होते, हे तपासणे आवश्यक आहे. स्वामीजींच्या काळातील निजामशाही इतिहासात गेली; आजची आव्हाने अधिक सूक्ष्म आणि आपल्या व्यवस्थेच्या आत दडलेली आहेत. म्हणूनच त्यांच्या स्मृतीकडे पाहताना इतिहासाचा गौरव आणि वर्तमानाची चिकित्सा हे दोन्ही एकत्र चालले पाहिजे. त्यांनी एका पिढीला राजकीय मुक्तीची दिशा दिली; पुढच्या पिढीसमोर त्यांनी शिक्षण, विवेक, समता आणि नैतिक सार्वजनिक जीवनाची वाट ठेवली. त्या वाटेवर आपण किती पुढे आलो आहोत, याचे उत्तर १७ सप्टेंबरच्या व्यासपीठावर मिळणार नाही; ते आपल्या शिक्षणसंस्थांच्या कारभारात, शिक्षकांच्या आचरणात, विद्यार्थ्यांच्या विचारात, राजकारणाच्या व्यवहारात आणि समाजाच्या दैनंदिन जीवनात दिसेल. स्वामी रामानंद तीर्थांच्या स्मृतीला खरी आदरांजली पुष्पहारात नसून त्यांच्या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान देण्यात आहे.

(लेखक हे मराठी विभाग,पीपल्स कॉलेज, नांदेड येथे प्राध्यापक आहेत.)

# विश्वकर्मा पूजन दिन विविध उपक्रमांनी साजरा

किनवट/प्रतिनिधी- विश्वकर्मा पूजन दिनाचे औचित्य साधून विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नगराध्यक्ष सौ.सुजाता एंड्रलवार यांच्या हस्ते श्री बालाजी चौक येथील विश्वकर्मा गणेश मूर्तीची व विश्वकर्मा प्रतिमेची पूजा आणि महाआरती करण्यात आली. दरम्यान विश्वकर्मा समाज बांधवांसह नगरसेवकांची उपस्थिती दिसून आली.



'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे योजने'तून श्री बालाजी चौकाचे लवकरच भव्य सुशोभीकरण करण्यात आपला मानस असून तसे उपस्थित जनसमुदायांना नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांनी आश्वासन दिले. भगवान विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त दिवसभर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. युवानेते क्रांतिशरण भीमराव केराम, नगरसेवक श्रीनिवास नेम्मानीवार, नगरसेवक सूरज सातूरवार, नगरसेवक प्रवीण राठोड, स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे, प्रभू कोल्हे, विश्वकर्मा समाज संघटनेचे अध्यक्ष किशन कोत्तापल्लीवार, रामलू गंनोजवार, राजू उटलावार, प्रमोद श्रीपादवार, अंकुश उमडवार, राजू गंनोजवार, गजानन राईचीवार, शुभम गंनोजवार, राजू दोंतूलवार, श्रीनिवास कणपत्तीवार, नवीन कणपत्तीवार, संदीप कोकाटे, राकेश गंनोजवार यांच्यासह विश्वकर्मा समाजाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विश्वकर्मा समाज संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व गणेश मंडळाचे अध्यक्ष, सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन विश्वकर्मा समाज संघटनेचे संतोष येलचलवार यांनी केले होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# यूपीआई एमडीआरमुळे बाजारपेठ प्रभावित होण्यास सुरुवात

## रोख व्यवहाराला व्यापाऱ्यांची पसंती

**स.रविंदरसिंघ मोदी**

नांदेड:केंद्र शासनाच्या वित्त विभागातर्फे येत्या दि. १५ ऑक्टोबर पासून यूपीआई आणी डेबिट, क्रिडिट कार्ड व्यवहारावर मर्चेंट डिस्काउंट रेट प्रणाली लावण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे देशाच्या बाजारापेठांमध्ये आता पासूनच मोठी हालचाल सुरु झाली आहे. एमडीआर मुळे व्यापाऱ्यांना टॅक्स भरावे लागणार आहे म्हणून व्यापऱ्यांनी डिजिटल व्यवहार कमी करण्याचे हत्यार बाळगायला सुरु केले आहे.

सध्या एमडीआर प्रस्तावावरुन बाजारपेठेत आणी जनसामान्यांत विविध प्रकारच्या चर्चा आणि संभ्रम एकावयास मिळत आहेत. तर दूसरीकडे डिजिटल देवाण-घेवाण आताच प्रभावित होण्यास सुरुवात झालेली आहे. दोन हजारावर खरीदी, विक्री व्यवहार केल्यास वीस रुपये अतिरिक्त मोजावे लागणार असे व्यापारी बोलत असल्याचे दिसून येते. व्यापाऱ्यांना ०.४ टक्के पर्यंत एमडीआर भरावा लागणार अशा चर्चांन्ना उधाण येऊन आता बाजारात डिजिटल व्यवहार बंद ठेवण्याचे निर्णय व्यापारी पाळायला सुरु झाले आहे. त्यामुळे येत्या सणासुदीच्या काळात ग्राहकांची मोठी पंचायत होणार असल्याचे चित्र आहे. पुढे, दसरा आणी दिवाळी सारखे मोठे सण आहेत. सणाच्या वेळी मोठ्या प्रमाणात खरेदी होत असते. व्यापाऱ्यांना यूपीआय व्यवहारावर एमडीआर भरावे लागणार असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर देवाण - घेवाण प्रक्रियेवर त्याचे प्रभाव पाहायला मिळेल. त्याची भीती बाळगुन आज पासूनच काही व्यापाऱ्यांनी यूपीआय व्यवहारा ऐवजी रोख पैसा व्यवहाराला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. दूसरीकडे यूपीआय वर मोठी खरीदी करण्यात येऊ नयेत, असे सल्ले देखील अभ्यासु लोकं देऊ लागले आहेत. त्यामुळे बजारात मोठ्या संख्येत रोख स्वरूपात होईल असे संकेत सध्या मिळत आहेत. त्यामुळे बँकेत असलेला पैसा बाजारात पोहचण्यास सुरुवात होईल हे नक्की. जर असे घडल्यास बँकेत धनकोश कमी होऊन त्याचे परिणाम अर्थव्यवस्थेवर होईल असे भाकित कोणीही सहज करू शकतो. एमडीआर लागु झाल्याने त्याचा मोठा प्रभाव शासकीय व नीमशासकीय पगारदार कर्मचाऱ्यांवर देखील होऊ शकतो. बँकेत जमा होणाऱ्या वेतना एवजी मग रोख स्वरूपात पगार करण्याची मागणी वाढू शकते. ज्यामुळे कोटयावधी राशिचे बँकेतुन व्यवहार न होता, रोख व्यवहार करण्याकडे पगारदार श्रेणीतील वर्ग अग्रेषित होण्याची भीती निर्माण झाली आहे. पोलिस दल, सैन्य दल, एलआयसी, महामंडल, खासगी कंपन्यामध्ये देखील कर्मचारी वर्ग एमडीआर प्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायला सुरुवात झाली आहे. एमडीआर प्रणाली इनकम टॅक्स भरणाऱ्या वर्गाला सुद्धा विचलित करत आहे. क्रिडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड वापर आणी ईएमआईवर एमडीआरचे प्रभाव काय होईल असे प्रश्न पुढे येताहेत. इनकम टैक्स भरल्यानंतर पुढे पुन्हा टॅक्स का प्रस्तावित व्हावा असे अनेकांना वाटत आहे. एमडीआर हे खासगी, धार्मिक व शैक्षणिक संस्थांना लागु राहतील काय असे प्रश्ननं पुढे येताहेत.



सामान्य ग्राहकासाठी यूपीआय निःशुल्क राहिल. एका व्यक्ति पासून दुसऱ्या व्यक्तिला व्यवहार ० टक्के राहिल. मित्र किंवा नातेवाईक यांना पैशे पाठवल्यास ०% एमडीआर व्यवहार राहिल. व्यापारिक व्यवहारावर रूपये दोन हजार व्यवहार झाल्यास मर्चेंट पेमेंट म्हणून ०.४ टक्के एमडीआर व्यापाऱ्याला भरावा लागणार. लहान व्यापऱ्यान्ना महिन्याला क्यूआर कोड वर एक लाख रूपये एवढेच व्यवहार करता येणार आहे. पुढच्या व्यवहारावर नियम वेगळ असणार आहे. म्यूचूल फण्ड, शेयर मार्केट ट्रेडिंग व आयपीओ साठी यूपीआय वापरल्यास ०.०२ टक्के प्रमाणे एमडीआर लागु होईल. उच्च मूल्य व्यवहार झाल्यास प्रती व्यवहारावर रूपये ३०० प्रमाणे सिमित प्रणालीने टॅक्स द्यावा लागेल. असे प्रस्तावित करण्यात आले आहे. यात केंद्र शासनाकडून काही फेरबदल होऊ शकते. किंवा व्यापारी वर्गाकडून काही मागणी पुढे येऊ शकते.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सहायक जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहन

किनवट/प्रतिनिधी- मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त किनवट येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सहायक जिल्हाधिकारी बी. सरवनन यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. दरम्यान तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, शाळा महाविद्यालये, शासकीय कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठवाडा मुक्ति - संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाचे स्मरण करून स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसदार मुक्ताबाई निवृत्ती सावते यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, उप विभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, पोलिस निरीक्षक जगदीश मंडलवार, नायब तहसीलदार मोहम्मद रफिक, रामेश्वर मुंडे, चंद्रशेख सहारे, बालाजी फोले, निलेश राठोड, माजी नगराध्यक्ष के.मूर्ती, निवृत्त नायब तहसीलदार भाऊराव जाधव, माजी नगरसेविका आशाताई कदम, संदिप निखाते, माजी सैनिक बळीराम कुडमेथे, तुकाराम माशीदवार, अशोक सिडाम, साहेबराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयातील ध्वजारोहण करून शेवटी मुख्य ध्वजारोहणाला उपस्थिती लावली होती.



राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुयणी परिसरातील शेतातील पिकाची पाहणी करुन शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी आ.बालाजी कल्याणकर व इतर उपस्थित होते.

# माहूर तालुक्यातील १९ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षणाकडे इच्छुकांचे लक्ष

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले असून, आता २२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे गावागावातील राजकीय इच्छुकांचे लक्ष लागले आहे. सरपंचपद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव होणार, यावर अनेक इच्छुकांच्या राजकीय भवितव्याचे गणित अवलंबून असल्याने आरक्षण सोडतीपूर्वीच ग्रामीण राजकारणात चर्चांना उधाण आले आहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अधिसूचनेनुसार माहूर तालुक्यातील ईवळेश्वर, बोरवाडी, माडवा, पवनाळा,पापलवाडी,हडसणी, आसोली, लिंबायत, अनमाळ, तांदळा, शेकापूर, लांजी, लखमापूर, रुई, गुंडवळ, वझरा शे. फ., मालवाडा, कुपटी आणि दत्तमांजरी या १९ ग्रामपंचायतींचा आरक्षण प्रक्रियेत समावेश आहे. अनुसूचित जातीसाठी १, अनुसूचित जमातीसाठी १, नागरिकांचा मागासवर्गासाठी ५ आणि खुल्या प्रवर्गासाठी १४, अशी एकूण २१ सरपंच पदे निश्चित करण्यात आली आहेत. यापैकी १२ पदे महिलांसाठी राखीव राहणार आहेत.

# दुष्काळाची बनावट यादी सोशल मीडियावर व्हायरल

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात दुष्काळग्रस्त गावांची यादी जाहीर झाल्याचा दावा करणारी बनावट यादी सोशल मीडियावर प्रसारित होत आहे. ही यादी अधिकृत नसून शेतकरी व नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, तसेच कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दुष्काळसदृश परिस्थि-तीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील पिकांची व पर्जन्यमानाची वस्तुस्थिती तपासण्याची प्रक्रिया सुरू आहे. दुष्काळाबाबत शासनस्तरावरून अधिकृत निर्णय झाल्यानंतर संबंधित यादी व आदेश अधिकृत माध्यमातून प्रसिद्ध करण्यात येतील. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित याद्यांवर विश्वास ठेवू नये तसेच त्या पुढे प्रसारित करू नयेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.


## जाहीर प्रगटन

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.एम.एम.पाटील, जिल्हा न्यायाधीश-१ कंधार)
मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९
बाबाराव वि.बालाजी व इतर

प्रति

१. बालाजी संभाजी डांगे वय :- मेजर वर्षे, कामधंदा-व्यवसाय रा.पोखरभोसी ता.कंधार जि.नांदेड

ज्याअर्थी बाबाराव उर्फ बबन पि.श्यामराव घोरबांड वय ५० वर्षे रा.कलंबर खु., ता.लोहा, जि.नांदेड यांनी मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९ बाबाराव वि.बालाजी व इतर हा अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठी सदरील अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त खटल्यात आपली उपस्थितीसाठी समन्स काढण्यात आले होते परंतु ते वारंवार न बजावता परत येत आहेत.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

करीता दिनांक २३.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिला मार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटिस देण्यात येते की आपण दिनांक २३.१०.२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठीचे प्रकरण एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरीष्ठ लिपीक** जिल्हा न्यायालय,कंधार

स्वाक्षरित/- **(अधिक्षक)** जिल्हा न्यायालय,कंधार

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
दिवाणी किरकोळ अर्ज (आर.जे.ई.) क्र.१३३५/२०२६

अर्जदार : १) व्यंकटेश्वर पि.नागनाथराव मुगावे वय : ५८ वर्षे, धंदा : नौकरी रा.११-४-५७६/१ क्रांतीचौक, एन.डी.-२ सिडको नवीन नांदेड, २) विमल भ्र.उत्तमराव कदम, विमल पि.नागनाथराव मुगावे वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम रा.कौशल्य नगर, धनेगाव नांदेड, ३) पद्मा भ्र.किशन जाधव, पद्मा पि.नागनाथराव मुगावे वय : ५१ वर्षे, धंदा : घरकाम रा.धनेगाव नांदेड, ४) सत्यभामा भ्र.विजयराव रामतिर्थे, सत्यभामा पि.नागनाथराव मुगावे वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम रा.पेठवडज ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्या अर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत लक्ष्मण नागनाथराव मुगावे यांचे वारस आहेत. मयत लक्ष्मण नागनाथराव मुगावे यांचा दि.२६/०६/२०२० रोजी शंकरराव चव्हाण मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल नांदेड येथे मृत्यू झाला आहे.

या नमूद अर्जदारा शिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहुन या न्यायालयात दि.१६/१०/२०२६ रोजी किंवा एक महिण्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** ३ रे सह दि.न्या.व.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/- **सह अधिक्षक** दि.न्या.व.स्तर,नांदेड

## CHANGE IN NAME

My (old name) is **TASNEEM FATIMA ABDUL QUEEM** which now I am, changing as (new name) **TASNEEM FATIMA ABDUL QAYUM**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**TASNEEM FATIMA ABDUL QAYUM**
c/o **ABDUL QAYUM DEWAN BADA** Kandhar, Taluka. Kandhar Dist Nanded
State. Maharashtra - 431714
Mobile No.8956998992

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.१३४६/२०२६

अर्जदार : १) प्रेमीला भ्र.मारोती जाधव वय : ३८ वर्षे, धंदा : घरकाम, २) गौरी पि.मारोती जाधव वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण, ३) जानव्ही पि.मारोती जाधव वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण वरील तिघे रा.जानकी निवास, पिपल्स हायस्कुल जवळ, गोकुळनगर, ब्रिज जवळ, शिवाजीनगर, नांदेड ता.जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मारोती पि.शंकरराव जाधव यांचे वारस आहेत. मयत मारोती पि.शंकरराव जाधव यांचा दि.२०/०५/२०१५ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जदार क्र.१ हे मयताची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ह्या मुली आहेत. या शिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहुन या न्यायालयात दि.२२/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १५/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** ३ रे सह दि.न्या.क.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/- **सह अधिक्षक** दि.न्या.क.स्तर,नांदेड

## शाळा सोडल्याचा दाखला हरवला आहे

माझा कु.समिक्षा प्रकाश नांदेडकर इयत्ता १० वी (२०२४) हॉरिझॉन डिस्कव्हर अकॉडेमी स्कूल, नांदेड या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला हरवला आहे. कृपया कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
**कु.समिक्षा प्रकाश नांदेडकर**
रा.ता.जि.नांदेड.

## जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,अर्धापुर
यांच्या न्यायालयात
समक्ष आर.बि.सोरकर दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,अर्धापुर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५८/२०२६
रामकिशन व इतर वि.निरंक

अर्जदार : १. रामकिशन पि.अशोक कल्यानकर, वय : ४० वर्षे, धंदा : मजूर, २. प्रविण पि.अशोक कल्यानकर, वय : ३८ वर्षे, धंदा - मजूर, ३. पुष्पाबाई पि.अशोक कल्यानकर, वय : ७० वर्षे, धंदा : निरंक सर्व रा.पिंपळगाव महादेव ता.अर्धापूर जि.नांदेड, ४. जयमाला भ्र.विलासराव देशमुख उर्फ लता पि.अशोक कल्याणकर, वय : ४५ वर्षे, धंदा : घरकाम रा.पिंपळगाव महादेव ता.अर्धापूर जि.नांदेड

वि.

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७, कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत अशोकराव पि.बापुराव कल्याणकर यांचा अर्जदार क्र.१ व २ ही मुले व अर्जदार क्र.३ ही पत्नी, अर्जदार क्र.४ ही विवाहीत मुली आहेत. अशोकराव पि.बापुराव कल्याणकर यांचा मृत्यू दिनांक ११.०२.२०१८ रोजी रा.पिंपळगाव महादेव ता.अर्धापूर जि.नांदेड.

अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक १२/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०८/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,अर्धापुर

स्वाक्षरित/- **स.अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर,अर्धापुर

## CHANGE IN MY NAME

I have Changed my name from Pyar Mohmmed Shaikh to Pyar Mohammed Shaikh

Henceforth be know and referred to as Pyar Mohammed Shaikh for all purposes. Kindly issue passport on my new name.

-:Contract:-
Address:- Plot No.10 Sameera Bag, Waghi Road Post Vazirabad,
District: Nanded
State: Maharashtra.
PIN Code: 431601
Contact no:-9890616544

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३५९/२०२६
शांताबाई व इतर वि.निरंक

अर्जदार : १. शांताबाई भ्र.चंद्रकांत पाचंगे, वय : ५२ वर्षे धंदा : घरकाम, २. गजानन पि.चंद्रकांत पाचंगे, वय : ३९ वर्षे धंदा : मजुरी, ३. बालाजी पि.चंद्रकांत पाचंगे, वय : ३८ वर्षे धंदा : मजुरी, ४. परमेश्वर पि.चंद्रकांत पाचंगे, वय : ३६ वर्षे धंदा : नौकरी, सर्व रा. घर नं.१-१५-९६९, हिंगोली रोड, उज्वल एंटरप्राईजेस च्या मागे, श्रीरामनगर, ता.जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत चंद्रकांत पि. व्यंकटराव पाचंगे यांचे वारस आहेत. मयत चंद्रकांत पि. व्यंकटराव पाचंगे यांचा दिनांक ०८/०१/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ ही मयताची मुले आहेत.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २६/१०/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** ५ वे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन'' स्वाक्षरित/- **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठाण जीवनगौरव, सन्मान सोहळा व सायं दै.नांदेड वार्ताच्या वर्धापन दिन विशेषांक प्रकाशन सोहळ्यातील क्षणचित्रे












# रणरागीणींच्या आक्रमक भूमीकेमुळे बेंदी तांडा येथे दारु, गुटखा विक्रीवर बंदीचा निर्णय

किनवट/प्रतिनिधी-बेंदी तांड्यातील अवैध दारु व्यवसायाला लगाम घालण्यासाठी अखेर तांड्यातील मातृशक्तींनाच रस्त्यावर उतरावे लागले. राज्य उत्पादन शुल्क असेल अथवा पोलीस प्रशासन असेल ते येथे ठेंगणे पडल्यामुळे महिला रणरागिणींच्या आक्रमक अभूतपूर्व एल्गाराला स्थानिक तंटामुक्ती समिती आणि ग्रामपंचायतीचे खंबीर पाठबळ मिळाले. तांड्याच्या एकजुटीने दारू, गुटखा, खर्रा आणि पानमसाला विक्रीवर 'कायमस्वरूपी बंदी' घालण्याचा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय घेतला हे इत्तरासाठी प्रेरणादायी ठरणार असे दिसते.

किनवट पोलीस ठाणे आणि स्थानिक राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यकक्षेतील बेंदीतांडा येथील तरुण पिढी आणि शाळकरी विद्यार्थी व्यसनाच्या गर्तेत ढकलली जात होती. दारूमुळे घराघरांत कलहाची ठिणगी पडायची; भांडण-तंटे, नागरिक व महिलांना त्रास आणि मनस्ताप सोसावा लागला. तांड्यातील सामाजिक स्वास्थ्य आणि जनारोग्य पुरते धोक्यात आले होते. अखेर महिला मंडळाच्या अध्यक्षा यशोदा यादव आडे यांनी मातृशक्तीला एकवटून टोकाची भूमिका घेतली. त्यांच्या या हाकेला स्थानिक तंटामुक्त समितीचे अध्यक्ष रमेश राठोड यांच्या नेतृत्वात ११ सप्टेंबर रोजी तांड्यातील हनुमान मंदिर प्रांगणात सर्व धर्मीय, सर्वपक्षीय नागरिक आणि महिलांचा प्रचंड जनसमुदाय उसळला. भक्तिमय आणि संवेदनशील वातावरणात पार पडलेल्या या बैठकीत एकमुखी वज्रमुठ बांधत व्यसनमुक्तीचा ऐतिहासिक ठराव संमत करण्यात आल्याचे सांगितले.गावात कोणतीही व्यक्ती देशी-विदेशी दारू, हातभट्टीचे रसायन, गुटखा,



खर्रा किंवा तत्सम प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची खरेदी-विक्री करू शकणार नाही. नियमांवर पाय ठेवून जर कोणी छुप्या मार्गाने दारू किंवा गुटख्याची अवैध विक्री करताना आढळल्यास, त्यास ११ हजार रुपये दंडाची शिक्षा केली जाईल. या बैठकीस उपसरपंच चंपत जाधव, महिला मंडळाच्या अध्यक्षा यशोदाबाई आडे, उपाध्यक्ष गौरीबाई राठोड, सचिव कुसुम चव्हाण यांच्यासह रामराव जाधव, प्रेमसिंग राठोड, एस.के.राठोड, साहेबराव राठोड, मधुकर राठोड, विनोद राठोड, बतासीबाई चव्हाण, जनाबाई जाधव, मीराबाई पवार, कमला पवार, सुरेखा जाधव, निर्मला आडे आदींसह गावातील अबालवृद्ध आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुलावरुन पडल्याने मजुराचा मृत्यू

माहूर/प्रतिनिधी-पुलाच्या कठड्याला दोरी बांधून पारवे पकडण्यासाठी पुलाच्या खाली उतरत असताना हात निसटल्याने खाली पडून गंभीर जखमी झालेल्या २३ वर्षीय मजुराचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना माहूर तालुक्यातील धनोडा फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पैनगंगा पुलावर शुक्रवार, दि.१८ रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

संतोष भिमराव टाले (वय २३, रा. रामवाडी, ता. कळमणुरी, जि. हिंगोली) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे.याबाबत मृत संतोषचे वडील भिमराव गोमाजी टाले यांनी माहूर पोलीस ठाण्यात अर्ज देऊन चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. अर्जात नमूद केल्यानुसार, संतोष हा दि. १२ सप्टेंबरपासून गावातील इतर मुलांसोबत मजुरीच्या कामासाठी धनोडा फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावर येत होता. शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजता ठेकेदार सुरेश रामचंद्र हरण (रा. धानोरा जहागीर, ता. कळमनुरी) यांनी संतोषच्या कुटुंबीयांना फोनद्वारे घटनेची माहिती दिली.

# पीपल्स कॉलेजमध्ये २१ ते ३० सप्टेंबर दरम्यान हिंदी पखवाडा

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेज, नांदेड येथील हिंदी विभागाच्या वतीने हिंदी पखवाडा समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. २१ ते ३० सप्टेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा व उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांनी प्रेरित होऊन हिंदी भाषा, संस्कृती आणि साहित्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रश्नमंजुषा, हिंदी चित्रपट गीतांवरील अंताक्षरी, पारंपरिक लोकगीत गायन स्पर्धा, दादा-दादी, नाना-नानी की कहानी! अपनी जुबानी! कथाकथन, स्वरचित काव्यवाचन, निबंध लेखन आणि पोस्टर मेकिंग अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. प्रश्नमंजुषा स्पर्धा २१ सप्टेंबर, अंताक्षरी २२ सप्टेंबर, पारंपरिक लोकगीत गायन २३ सप्टेंबर, कथाकथन २४ सप्टेंबर, काव्यवाचन २५ सप्टेंबर, निबंध लेखन २६ सप्टेंबर, तर पोस्टर मेकिंग स्पर्धा २८ सप्टेंबर रोजी होणार आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी संबंधित आयोजकांकडे पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे.३० सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी ३००, प्रमाणपत्र व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकासाठी २००, प्रमाणपत्र व ट्रॉफी, तर तृतीय क्रमांकासाठी १००, प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात येणार आहे. हिंदी विभागप्रमुख डॉ. भगवान जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हिंदी पखवाडा यशस्वी करण्याचे आवाहन हिंदी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरुन दुष्काळाच्या आढावा बैठकीत...

संताप व्यक्त होत आहे. सदरील बैठक बळीराजाला मदत करण्यासाठी होती की काजू-बादाम खाण्यासाठी होती असा सवाल सर्वसामान्य नागरिक करीत आहेत. सदरील प्रकाराबाबत विरोधी पक्षांनी जोरदार टीका केली आहे. तसेच राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही नाराजी व्यक्त केली.

### कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा...

जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा अशा घोषणा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केल्या. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे यांनी पावसाअभावी सुकलेले सोयाबीन आणुन ते कृषी मंत्र्यांना दाखविले. पावसा अभावी खरीपातील पिके करपली गेली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे कृषी मंत्र्यांकडे करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष अब्दुल गफार, डॉ.श्रावण रॅपनवाड, ॲड.सुरेंद्र घोडजकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

### सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी-ना.दत्तात्रय भरणे


राज्यातील काही भागात दुष्काळाचे संकट मोठे आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली. दुष्काळाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. हा अत्यंत महत्वाचा व संवेदनशिल विषय असून यावर कोणीही राजकारण करु नये. शेतकऱ्यांना मदत करणे हीच आपली प्राथमिकता असली पाहिजे. केंद्र सरकारची मदत वेळेत मिळेलच पण त्याआधी राज्य सरकारच्या माध्यमातून लवकरात लवकर शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत आणि पीकविम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी सरकार कटीबद्ध असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

## पान १ वरुन निकष बाजूला ठेवून सरकारने...

करणे आवश्यक आहे. २०२४-२५ मधील पिकविम्याचे पैसे अनेक शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. शेतकऱ्यांच्या पिकविम्यासाठी आम्ही सरकारकडे व कंपन्यांकडे पाठपुरावा करीत आहोत. कंपन्यांकडील थकीत पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांना देण्यासाठी पाऊले उचलणे आवश्यक आहे. अशा पिकविम्याचे पैसे मिळाले तर शेतकऱ्यांना आधार मिळेल. शासनाने शेतकऱ्यांसाठी मंजूर केलेल्या अनुदानाच्या रक्कमा बँकेत जमा केल्या आहेत. परंतु बँकांनी सदरील रक्कमा शेतकऱ्यांना न देता होल्डींगवर ठेवल्या आहेत. बँकांनी होल्डींग हटवून शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम द्यावी, असे निर्देश सरकारने द्यावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. दुष्काळग्रस्त भागात पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चारा छावण्या, जलजीवनची कामे, अखंडीत वीज पुरवठा व जलसंधारणाची कामे सुरु करावीत अशा संकट प्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याची सरकारची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने कोणत्याही प्रशासकीय अहवालाची वाट न पाहता निष्कर्ष शिथिल करुन मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करावा अशी एकमुखी मागणी लोकप्रतिनिधींनी केली. सत्ताधारी पक्षाच्या काही आमदारांनी सरकारच्या कारभारावरच या बैठकीत टीका केली. राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या सुचनांनुसार कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना ४० हजार ३८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार असून कर्जमाफी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक ते सहकार्य करावे. कर्जमाफीची तिसरी यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याची ही सर्वांची सामुहिक जबाबदारी असून प्रशासनातील सर्व घटकांनी समन्वयाने कामे करावीत असे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. या बैठकीला मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, कृषी अधिकारी उपस्थित होते.

## शेवंताबाई सिताराम राठोड रांचे निधन

परभणी/प्रतिनिधी-गंगाखेड तालुक्यातील शिवाजीनगर तांडा



रेथील ज्येष्ठ नागरीक शेवंताबाई सिताराम राठोड (वर ७८) यांचे वृद्धपकाळाने आज दि. १८ रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, २ मुली, सुना, नातु, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर शनिवारी सकाळी शिवाजीनगर तांडा येथे सकाळी अंत्रसंस्कार करण्यात आले.

## धर्माबादमध्ये ऑनलाईन लॉटरी सेंटरवर पोलीसांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-धर्माबाद शहरात सुरु असलेल्या ऑनलाईन लॉटरी सेंटरवर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग व धर्माबाद पोलीसांनी धाडी टाकुन आरोपींना अटक केली आहे.

ऑनलाईन राजश्री लॉटरीच्या नावाखाली जुगार खेळवीत असतांना पोलीसांनी मो.आसीफ मो.अनवर, संतोष पबतवार, साईनाथ उर्फ अंजु बोलमवार यांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त केले. तसेच रामनगर परिसरात सुरु असलेल्या मटका अड्डुयावरही पोलीस पथकाने धाड टाकून दोन जणांना अटक केली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४